महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
११/२०१८ या बैठकीचे कार्यवृत्तांत
दिनांक १० ऑक्टोबर २०१८ सकाळी ११.३० वाजता

मुद्दा क्र. १ : दिनांक २६/९/२०१८ च्या प्राधिकरणाच्या १०/१८ च्या बैठकीच्या कार्यवृत्तांताचे दृढीकरण एकमताने करण्यात आले.

मुद्दा क्र.२ : मजनिप्रामध्ये "संशोधन व विकास कक्ष ("Research and Development Cell") स्थापन करण्याबाबतची संकल्पना सदस्य (अर्थ) यांनी बैठकीमध्ये मांडली. याबाबत सदस्य (जसं अभियांत्रिकी) यांनी अशाप्रकारचे काम मजनिप्रा पुरते मर्यादित न ठेवता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील माहिती मिळवून त्याचा उपयोग राज्य स्तरावर जलक्षेत्रासाठी व्हावा या उद्देशाने अधिक व्यापक स्वरुपात " Centre of Excellence" स्थापन करुन अशा संशोधनातून विकसित होणा-या संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी त्यामध्ये एक सुकाणू समिती ( Steering Committee ) नेमावी असे प्रतिपादन केले. या समितीमध्ये मजनिप्राचे अध्यक्ष हे अध्यक्ष म्हणून असावेत आणि सदस्य (अर्थ) हे सदस्य असावेत असे त्यांनी प्रस्तावित केले. अन्य सदस्यांमध्ये या सेंटरच्या उद्दिष्टय पूर्तीसाठी शासनाच्या विविध संबंधित विभागांचे प्रधान सचिव/ सचिव असतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. Best practices in the World pullout करणे व Role out करणे हे या सेंटरचे उद्दिष्ट राहील. या केंद्रासाठीचा निधी सल्लामसलत प्रक्रियेव्दारे जनमत आजमावून भविष्यात पाणीपट्टीवर १ टक्केप्रमाणे उपकर आकारुन उभारता येईल, अन्यथा मे. टाटा, रिलायन्स सारख्या खाजगी कंपन्यांचे प्रतिनिधींना सदस्य म्हणून स्थान देऊन Corporate Social Responsibility (CSR) मधून सुध्दा निधी उभारणे शक्य होईल असे सदस्य ( जसं अभियांत्रिकी ) यांनी नमूद केले. याबाबत Centre of Excellence ची रुपरेषा देऊन त्यानंतरच्या प्राधिकरणाचे बैठकीत ठरावाव्दारे मंजुरी देण्याच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या.

अध्यक्षांचे आभार मानून प्राधिकरणाची बैठक समाप्त करण्यात आली.

KPBakshi
१९/१०/18

(के.पी. बक्षी)
अध्यक्ष